# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः22.05.2024** **वारःबुधवार**

---

1 ) देशातील विरोधी पक्षांची इंडि आघाडी ही महिलांच्या विरोधात—पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आरोप
2 ) भारतीय सशस्त्र दलांनी आपल्या दृष्टिकोनात अनुकूलता आणि नावीन्य आणण्याची गरज - संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट यांचं प्रतिपादन
3 ) रामेश्वरम स्फोटाचे धागेदोरे उलगडण्यासाठी एन आय ए ची धडक कारवाई
4 ) भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जागतिक बॅडमिंटन संघटनेच्या क्रमवारीत पुन्हा अव्वलस्थानी
आणि
5 ) उत्तर भारतातील अनेक राज्यात उष्णतेची लाट अधिक तीव्र

**पंतप्रधान**

देशातील विरोधी पक्षांची इंडिआघाडी ही महिलांच्या विरोधात असून त्यातील पक्षांचा महिला आरक्षणाला विरोध आहे, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केला. उत्तरप्रदेशातील त्यांच्या वाराणसी मतदारसंघात संपूर्णनानंद संस्कृत विद्यापीठात आयोजित नारीशक्ती संमेलनात ते बोलत होते. या संमेलनांत गृहिणी तसंच डॉक्टर, वकील, उद्योजक, खेळाडू आदि विविध क्षेत्रातील महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले, की उत्तरप्रदेशात कॉंग्रेस आणि समाजवादी पक्षाचं सरकार असताना महिला अत्यंत असुरक्षित जीवन जगत होत्या, त्या तुलनेत सध्या योगी आदित्यनाथ सरकारच्या काळात महिला स्वतःला अधिक सुरक्षित मानत आहेत. गेल्या 60 वर्षांत सत्तेत असलेल्या सरकारांनी महिला कल्याणचा विचार केला नाही पण आपल्या भाजप सरकारने केवळ महिला विकासासाठी धोरण आणि योजना राबवल्या, इतकंच नाही तर महिलांना 33 टक्के आरक्षणही दिलं असं मोदी म्हणाले.

दरम्यान, प्रयागराज इथ एका प्रचार सभेत बोलताना मोदी यांनी आपल्या भाषणात समाजवादी पार्टी आणि बहुजन समाजवादी पार्टी यांच्या कार्यकाळात उत्तरप्रदेशात माफिया राज वाढल्याबद्दल जोरदार टीका केली. पंतप्रधान म्हणाले की उत्तर प्रदेशात या या दोन्ही पक्षांचं सरकार असताना गुंडांना अवैध कामगिरी करायचं पूर्ण स्वातंत्र्य होतं. ते बळाचा वापर करून गरीब जनतेच्या जमिनी लुबाडत होते, मात्र आता योगी सरकारच्या काळात या सर्वाला चाप बसला आहे . पंतप्रधान मोदी यांनी प्रयागराज मधील भाजप उमेदवार नीरज त्रिपाठी आणि फुलपूर मधील उमेदवार प्रवीण पटेल यांच्या प्रचारासाठी ही सभा घेतली . पंतप्रधानांचा काल वाराणसीतच मुक्काम होता, आज ते उत्तरप्रदेशात आणखी दोन ठिकाणी सभा घेणार आहेत .

**प्रचार**

नवी दिल्लीत लोकसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून भाजप, काँग्रेस, आप अशा विविध पक्षांचे ज्येष्ठ नेते दिल्लीच्या विविध भागात जोरदार प्रचारसभा घेऊन मतदारांना आपल्या पक्षाकडे आकर्षित करत आहेत.

**अजय भट्ट**

जगात भू-राजनैतिक परिस्थिती सतत बदलत असून त्या पार्श्वभूमीवर भारतीय सशस्त्र दलांनी आपल्या दृष्टिकोनात अनुकूलता आणि नावीन्य आणण्याची गरज आहे, असं मत संरक्षण राज्यमंत्री अजय भट्ट यांनी व्यक्त केलं. नवी दिल्लीत, 'भारतीय सामुद्रिक धोरण संस्कृतीचा इतिहास' या विषयावर आयोजित परिषद आणि प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी देशाच्या संरक्षणात सैन्याचं महत्त्व अधोरेखित केलं.

या प्रदर्शनाचं आयोजन 'भारतीय सैन्य विरासत महोत्सवा अंतर्गत' 'प्रोजेक्ट उद्भव' या योजनेखाली करण्यात आलं आहे . प्रोजेक्ट उद्भवची सुरवात मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केली होती. दरम्यान, प्रोजेक्ट उद्भव मुळे भारतीय आणि परदेशी विद्वानांना संरक्षण विषयातील बौद्धिक चर्चा करायला व्यासपीठ उपलब्ध झालं आहे असं मत लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**सीडीएस**

इंटिग्रेटेड थिएटर कमांड हा सैन्य दलांना लष्करी सज्जता आणि युद्ध लढण्याच्या दृष्टीनं आणखी वरच्या पायरीवर नेण्यासाठीचा पाया ठरेल असा विश्वास सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल व्यक्त केला. या पुढील काळात सैन्य दलांनी संयुक्तपणे काम करण्याची गरज या विषयावर नवी दिल्लीत झालेल्या एका कार्यक्रमाला संबोधित करताना जनरल चौहान यांनी कार्यात्मक इंटिग्रेटेड थिएटर कमांडच्या निर्मितीसाठी सैन्य दलांचा समन्वय आणि एकजूट ही प्राथमिक गरज असल्याचं म्हटलं. अशा कमांडच्या निर्मितीमुळे ऑपरेशनल कमांडर सुरक्षेच्या मुद्द्यांवर अधिक लक्ष केंद्रित करू शकेल, थिएटर कमांड ही अंतिम पायरी नसून ती पुढील सुधारणांची सुरुवात असेल, असंही जनरल चौहान म्हणाले.

**कॅफे-स्फोट-**

रामेश्वरम कॅफेमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामागच्या कटाचे धागेदोरे उलगडण्यासाठी राष्ट्रीय तपास संस्थेनं चार राज्यांमध्ये अनेक ठिकाणी धडक कारवाई हाती घेतली आहे. NIA पथकांनी समन्वयानं कारवाई करत कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगण आणि आंध्र प्रदेशात ११ ठिकाणी धाडी टाकल्या आणि तेथील परसराचा कसून तपास करण्यात आला. विविध डिजिटल उपकरणं आणि कागदपत्रं हस्तगत करण्यावर लक्ष केंद्रित करून ही तपासणी करण्यात आल्याचं NIA कडून सांगण्यात आलं.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज इराणच्या भेटीवर जात आहेत. इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. सईद इब्राहीम रईसी आणि परराष्ट्र मंत्री डॉ. अब्दुल्ला हियान यांच्या श्रद्धांजली सभेत ते सहभागी होणार आहेत. राष्ट्राध्यक्ष रईसी आणि अब्दुल्लाहियान यांचं 19 मे रोजी हेलिकॉप्टर अपघातात निधन झालं होतं. राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच आपले शोकसंदेश इराण सरकार आणि जनतेप्रती पाठवले आहेत. भारताचे परराष्ट्रव्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात जाऊन या दुःखद घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला.

**<u>पोर्टल</u>**

उंच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत शिक्षकांसाठी केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2024 साठी अर्ज करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. या पुरस्कारांसाठी नामांकनं दाखल करण्यासाठी उच्चशिक्षण सचिव संजय मूर्ती यांनी काल एका पोर्टलच उद्घाटन केलं. हे पुरस्कार उच्चशिक्षण संस्थांमध्ये अध्यापन करणाऱ्या तांत्रिक आणि अ-तांत्रिक शिक्षकांना देण्यात येणार आहेत. त्यासाठी महाविद्यालयं, विद्यापीठं आणि उच्च तंत्र निकेतन विद्यालयांचे पात्र शिक्षक नामांकन दाखल करू शकतात. या क्षेत्रातील अध्यापनाचा किमान पाच वर्षांचा अनुभव त्यासाठी आवश्यक आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख 20 जून असून येत्या 5 सप्टेंबरला शिक्षक दिनाच्या दिवशी या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे.

**<u>एफआयएच</u>**

FIH प्रो हॉकी लीग स्पर्धेत, आजपासून बेल्जियममधील अँटवर्प इथं भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघाच्या युरोपियन लीगच्या पूर्वार्धातील सामन्यांना सुरुवात होणार आहे. पुरुष आणि महिला दोन्ही संघांची आज संध्याकाळी अर्जेंटिनाच्या संघांशी गाठ पडणार आहे. महिला संघाचा सामना भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी पावणेचार वाजता गोणार आहे. तर हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील पुरुष संघ संध्याकाळी ६ वाजता अर्जेंटिनाविरुद्धचा सामना खेळणार आहे. सध्या, भारतीय पुरुष संघ आठ सामन्यांतून 15 गुण मिळवून प्रो-लीग गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. तर महिला संघ आठ गुणांसह सहाव्या स्थानावर आहे.

**<u>स्पर्धा</u>**

बँकॉक इथं सुरू असलेल्या या वर्षीच्या आशियाई रिले अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिलांच्या 4 गुणिले 400 मीटर रिले संघांनी काल दोन रौप्यपदकं पटकावली. भारताच्या पुरुष धावपटूंच्या रिले संघानं स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळवला. यामध्ये श्रीलंकेला सुवर्ण तर व्हिएतनामच्या संघाला कास्यपदक मिळालं. महिला गटात ही भारतीय संघ दुसरा आला. महिला गटात व्हिएतनाम आणि जपाननं अनुक्रमे पहिला आणि तिसरा क्रमांक मिळवला.

**<u>रांकीरेड्डीचिरागशेट्टी</u>**

भारताच्या सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीनं नुकत्याच पार पडलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत अजिंक्यपद पटकावल्यानंतर जागतिक बॅडमिंटन संघटनेच्या क्रमवारीत पुन्हा अव्वलस्थानी झेप घेतली. या स्पर्धेच्या आधी ही जोडी तिसऱ्या क्रमांकावर होती. मात्र, उत्तम कामगिरीच्या जोरावर त्यांनी या स्पर्धेतले सर्व सामने थेट गेम्समध्ये जिंकले आणि जागतिक क्रमवारीत पहिलं स्थान पुन्हा मिळवलं.

**हवामान**

उत्तर भारतातील राजस्थान, पंजाब, हरियाणा- चंडीगढ- दिल्लीसह बहुतांश भागात उष्णतेची लाट आणखी तीव्र झाल्याचं दिसून येत आहे. मध्य प्रदेश,विदर्भ आणि गुजरातमध्येही अशीच स्थिती आहे. पुढील चार दिवसात या भागात उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्यानं भारतीय हवामान विभागानं सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला आहे. दिल्लीत पारा सतत वर जात असून मंगेशपूर आणि पितमपुरा इथं ४४ पूर्णांक ६ अंश तर नजाफगड इथं ४३ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाल्याचं IMD चे वरिष्ठ शास्त्रज्ञ आर के जेनामणी यांनी आकाशवाणीच्या वार्ताहराशी बोलताना सांगितलं. राजधानीत येत्या २५ तारखेपर्यंत रेड अलर्ट कायम राहणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. दरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस आणखी पुढे सरकण्यासाठी अग्नेय अरबी समुद्र, मालदिव्ज, कोमोरिन आणि अंदमान निकोबारच्या आणखी भागात स्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार